# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**केंद्र शासन कर्जमाफी व सवलत योजना २००८ रकमेच्या अन्यायकारी वसूलीबाबत**

**(१) ४६३२ (२३-१२-२०१४). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने २००८ मध्ये कर्जमाफी व सवलत योजना जाहीर केली व नाबार्डमार्फत त्याची अमंलबजावणी केली या योजनेचा कोल्हापूर जिल्हातील २ लाखांवर शेतक-यांनी अंदाजे २९२ कोटीचा लाभ मिळाला हे खरे आहे का,

(२) असल्यास, काही तक्रारीवरुन सन २०१२ मध्ये कोल्हापूर जिल्हयातील ४५६६६ शेतक-यांचे रु. ११२ कोटीचे कर्जमाफी मंजूरी पेक्षा जादा पतपुरवठा हा निकष काढून नाबार्डचा सूचनेबदहुकूम जिल्हा बँकेने अपात्र ठरवून कर्जदार शेतकरी, सहकारी संस्था अथवा सचिव यांना सुचना न देता रु. ४४ कोटी परस्पर वसूल करुन (बेकायदेशीरत्या) जमाखर्चही केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या मूळ योजनेत कर्ज मर्यादेबाबत कोणत्याही अटी नसताना नाबार्ड ने काढलेला निष्कर्ष हा चूकीचा आहे. तसेच तक्रार झालेनंतर जिल्हा लेखापरिक्षक यांनी सहकारी संस्थेचे ऑडीट केले त्यामध्ये फारसा फरक दिसला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर जिल्हा बँकेचे सेवा संस्थेचे सचिव एक महिना रजेवर असताना संस्थेकडून कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नसताना यांनी दिलेली माहिती यामध्ये तफावत आहे, हे खरे आहे का,

(५) असल्यास, सदर केंद्र शासन कर्जमाफी व सवलत योजना २००८ रकमेचा अन्यायकारी वसूलीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली किंवा करण्यात येणार आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

(५) नाबार्डने बँकेच्या सन २००८-०९ करिता केलेल्या वैधानिक लेखापरिक्षणामध्ये क.म. मंजूरीपेक्षा जादा झालेले कर्ज वितरण योजनेसाठी अपात्र ठरवून रु.११२.८९ कोटी रोखून ठेवले व बँकेस योजनेपोटी येणे असलेली रक्कम रु.९२.०३ कोटी समायोजित करुन उर्वरित रु.२०.८६ कोटी रक्कम बँकेकडून भरणा करुन घेतली. तसेच सदर रक्कम भारत सरकारकडे परत केली आहे.

शेतकऱ्यांना अपात्र रक्कम एकाच वेळी परतफेड करणे आर्थिकदृष्ट्या अशक्य असल्याने काही विकास सेवा संस्थांच्या मागणीनुसार अपात्र कर्जाचे रुपांतर करण्यात येऊन ३, ५ व ७ वर्षे मुदतीचे हप्ते पाडण्यात आलेले आहेत. ज्या शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग घेतलेला नाही, अशा शेतकऱ्यांना थकबाकीदार समजून वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

---

**आदिवासी समाजाला शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी शासनाकडून विविध योजनांद्वारे शेकडो कोटी रुपये खर्च केले जात असतांनाही योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नसल्याबाबत**

**(२) ७४४७ (०९-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी समाजाला शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी शासनाने विविध योजनांद्वारे कोट्यावधी रुपये खर्च केले असतांनाही या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नसल्याचे आरोप आदिवासी विद्यार्थ्यांनी केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयात शिकणा-या विद्यार्थ्यांना गेल्या ३ वर्षापासून शिष्यवृत्ती मिळाली नसून मासिक भत्ताही वेळेवर मिळाला नाही व त्यांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने दिनांक ४ डिसेंबर, २०१४ रोजी ठाण्यातील एकात्मिक आदिवासी विभाग अप्पर आयुक्तालयावर मोर्चा काढण्यात आला असून सदरहू मोर्चामध्ये राज्यातील १२३ आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थी सहभागी झाले असून त्यांनी सविस्तर निवेदन अप्पर आयुक्त एकात्मिक आदिवासी विभाग, ठाणे यांचेकडे सुपूर्द केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनातील मागण्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, सदरहू निवेदनातील मागणीनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२९-०३-२०१७) :** (१) व (२) राज्यातील १२३ आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या वतीने दि.०४.१२.२०१४ रोजी मोर्चाद्वारे अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांना निवेदन सादर केलेले होते, हे खरे आहे.

(३) शासकीय वसतीगृहातील सोयी सुविधांबाबत विभागाच्या दि.११.११.२०११ शासन निर्णयात नमूद तरतूदींनुसार आहार, शेक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता, संगणक, टि.व्ही, इंटरनेट, बेडींग साहित्य इ. सोयी सुविधा मिळण्याबाबत निवेदनात मागण्या केल्या होत्या.

(४) शासनाने निश्चित करुन दिल्यानुसार वसतीगृहातील विद्यार्थ्यांना नियमित आहार देण्यात येतो. विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, इतर शैक्षणिक भत्ते तसेच स्टेशनरी, क्रमिक पुस्तके, लोखंडी पलंग, ब्लँकेट, उशी, चादर इ. सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे संगणक, टि.व्ही, इंटरनेट, वॉटर कुलर इ. सुविधा जागेच्या उपलब्धतेनुसार पुरविण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकात्मिक आदिवासी प्रकल्पा अंतर्गत पालघर जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळेतील अपुऱ्या सोईसुविधांबाबत**

**(३) ९४४५ (१०-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर, ठाणे, रायगड जिल्हयातील ८७ आदिवासी वसतीगृहात राहून इतरत्र शाळा महाविद्यालयात शिक्षण घेणा-या हजारो विद्यार्थी विद्याथीनींना गेल्या अनेक वर्षापासून दर्जाहीन जेवण, निकृष्ट अल्पोपाहार तसेच इतर सोयी-सुविधा च्या मागणीसंदर्भात दिनांक ४ डिसेंबर, २०१४ रोजी ठाण्यातील कार्यालयावर काढलेल्या मोर्चाच्या अप्पर आयुक्त, यांनी आश्वासनापलिकडे कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे विद्यार्थ्यांनी आश्वासन न पाळल्याने दिनांक २२ जानेवारी, २०१४ पासून आमरण उपोषण सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपोषणामुळे पालघरमधील २० विद्याथीनीची प्रकृती खालावलेली असून त्यांना शासकीय ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व तद्नुसार सदर विद्यार्थ्यांच्या मागण्यासंदर्भात शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२९-०३-२०१७) :** (१) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अखत्यारीतील आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या वतीने दि.०४.१२.२०१४ रोजी मोर्चाव्दारे अपर आयुक्त, ठाणे यांना वसतीगृहातील अपुऱ्या सोयी सुविधांबाबत निवेदन सादर केलेले होते, हे खरे आहे.

सदर विद्यार्थ्यांना पाठींबा म्हणून आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, पालघर येथील विद्यार्थीनीनी दि.२०.१२.२०१४ रोजी उपोषणास बसल्या होत्या.

(२) उपोषणास बसलेल्या मुलींनी जेवण न केल्यामुळे आलेल्या थकव्याने १० ते १२ मुलीना चक्कर येऊ लागल्याने त्यांना ग्रामीण रुग्णालय, पालघर येथे दाखल केले होते व त्यापैकी ४ मुलींना खाजगी ट्रस्टच्या दवाखान्यात दाखल केले होते.

(३) प्रस्तुत प्रकरणी आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांनी सदर विद्यार्थ्यांशी व्यक्तींश: चर्चा केली व तद्ननंतर विद्यार्थ्यांनी उपोषण मागे घेतले.

तसेच विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार, शासनाने निश्चित करुन दिल्याप्रमाणे वसतिगृहातील, विद्यार्थ्यांना नियमित आहार व इतर सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळेत शिक्षण देण्याच्या योजनेबाबत

**(४) १६३५४ (३१-०७-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागातर्फे दरवर्षी अनुसूचित जमातीच्या २५०० विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळेत शिक्षण देण्याची योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे लक्ष येत्या शैक्षणिक वर्षापासून दहापटीने वाढविले असून २५ हजार विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश देऊन, महाबळेश्वर, पाचगणी, चिखलदा, पन्हाळा, लोणावळा येथील शाळेसाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे ५० हजार रुपये जिल्ह्याच्या ठिकाणी ४५ हजार व तालुक्याच्या ठिकाणी ४० हजार रुपये शासन शाळांना देऊन या माध्यमातून करोडो रुपये इंग्रजी शाळांना वाटण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, शासनाच्या उपरोक्त निर्णयामुळे मराठी शाळा बंद पडणार आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, आदिवासी विद्यार्थी शिकत असलेल्या मराठी माध्यमांच्या शाळांच्या उत्कर्षासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२९-०३-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून नामांकित निवासी शाळा योजनेंतर्गतची लाभार्थी संख्या दहा पटीने वाढवून लक्षांक २५,००० इतका करण्यात आला. तसेच सदर शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ मध्ये महाबळेश्वर, पाचगणी, चिखलदारा, पन्हाळा, लोणावळा येथील शाळेसाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे ५० हजार रुपये जिल्ह्याच्या ठिकाणी ४५ हजार व तालुक्याच्या ठिकाणी ४० हजार रुपये प्रतीवर्षी देण्याबाबत निश्चित करण्यात आली होते. तथापि, दि.२७.०६.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१६-१७ पासून नामांकित शाळा निवडीकरीता तसेच प्रती विद्यार्थी शैक्षणिक शुल्क ठरविण्यासाठी निकष ठरविण्यात आलेले आहेत. शाळेत उपलब्ध निकषाच्या अनुषंगाने प्राप्त गुणांकनानुसार शाळेस शुल्क अदा करण्यात येत आहे.

(३) विभागाच्या दि. २८.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये आधुनिक शिक्षण पध्दतीमध्ये इंग्रजी माध्यमाचे वाढते महत्व विचारात घेता अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याची योजना शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

योजनेंतर्गत अनुसूचति जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये इ. १ ली ते १२ वी पर्यंत मोफत शिक्षण देण्यात येते, सदर विद्यार्थ्यांना आहार, निवास, आवश्यक शैक्षणिक साहित्य शाळेमार्फत पुरविण्यात येते, त्याबदल्यात सदर शाळांना शासनाने निश्चित केल्यानुसार प्रती विद्यार्थी शुल्क देण्यात येते.

(४) हे खरे नाही.

(५) आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या मराठी माध्यमांच्या आश्रमशाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व सोयी सुविधा मिळावे या दृष्टीकोनातून कार्यवाही करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील साखर कारखानाकडे थकलेल्या ४७२ कोटी रुपयांचा कर्ज वसुलींसाठी महाराष्ट्र सहकारी बँकेने ८ सहकारी साखर कारखाने व एक सुतगिरणी आणि १ दाळ मिलची मालमत्ता विक्रीस काढल्याबाबत**

**(५) १८००७ (१४-०८-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखानाकडे थकलेल्या ४७२ कोटी रुपयांचा कर्ज वसुलींसाठी महाराष्ट्र सहकारी बँकेने ८ सहकारी साखर कारखाने व एक सुतगिरणी आणि १ दाळ मिलची मालमत्ता विक्रीस काढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कारखाने कोणते आहेत व आतापर्यंत ४७२ कोटी रुपये पैंकी किती रक्कम वसुल झाली आहे व किती बाकी आहे,

(३) अद्यापी ही रक्कम वसुल झाली नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे. याबाबत राज्य सहकारी बँकेने दि.१२/७/२०१५ रोजी दैनिक फायनान्शियल एक्सप्रेसमध्ये विक्रीची नोटीस प्रसिध्द केली आहे.

(२) सदरचे कारखाने पुढीलप्रमाणे :

१) विनायक सहकारी साखर कारखाना लि., ता.वैजापूर, जि.औरंगाबाद २) जिजामाता सहकारी साखर कारखाना लि., दुसरबीड, ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा, ३) देवगिरी सहकारी साखर कारखाना लि., गिरजानगर, ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद, ४) पारनेर तालुका सहकारी साखर कारखाना लि., देवी भोरे, ता.पारनेर, जि.अहमदनगर, ५) जय जवान जय किसान सहकारी साखर कारखाना लि., नाळेगाव, ता.चाकूर, जि.लातूर, ६) कडा साखर कारखाना लि., कडा, ता.आष्टी, जि.बीड, ७) नगर तालुका सहकारी साखर कारखाना लि., वाळकी, देऊळगांव राजा,

जि.अहमदनगर, ८) डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर सहकारी साखर कारखाना लि., ता.निलंगा, जि.लातूर.

उक्तपैकी पारनेर तालुका सहकारी साखर कारखाना लि. देविभोरे, जि.अहमदनगर या कारखान्याच्या मालमत्ता विक्रीतून रु.३१.७५ कोटी बँकेस प्राप्त झाले असून या रकमेतून बँकेचे कर्ज मुद्दल वसूल झाले आहे व दि.३०/०९/२०१६ अखेर नोंदविलेल्या व्याजापैकी रु.४४.५८ कोटी येणे बाकी आहे.

त्याचप्रमाणे नगर तालुका सहकारी साखर कारखाना लि. वाळकी देऊळगाव, जि.अहमदनगर या कारखान्यांच्या इमारत व यंत्र सामुग्री विक्रीतून रु.३८.२५ कोटी वसूल झाले आहेत. तसेच कारखान्याकडील जमिन विक्रीची कार्यवाही बँकेमार्फत सुरु असून कारखान्याकडे दि.३०/९/२०१६ अखेर रु.७.३१ कोटी येणे बाकी आहे.

तसेच माऊली सहकारी सुतगिरणी लि. देवराई जि.बीड या संस्थेची यंत्र सामुग्री विक्रीतून रु.३६ लाख वसूली झाली असून या सूतगिरणीकडे दि.३०/९/२०१६ अखेर रु.३५.०६ कोटी येणे बाकी आहे व यासाठी सुतगिरणीकडील जमिन व इमारत विक्रीची कार्यवाही बॅकेमार्फत सुरु आहे.

राज्य सहकारी बँकेमार्फत मालमत्ता विक्रीची नोटीस प्रसिध्द केलेल्या ११ संस्थांकडे दि.३०/९/२०१६ अखेर रु.५३२.८७ कोटी येणे बाकी आहे.

(३) उक्त नमूद केल्याप्रमाणे नगर तालुका सहकारी साखर कारखाना लि., वाळकी देऊळगाव व माऊली सहकारी सूतगिरणी लि. या संस्थांकडील उर्वरीत मालमत्ता विक्रीची प्रक्रिया राज्य सहकारी बँकेमार्फत सुरु आहे. अन्य ८ संस्थांच्या मालमत्ता विक्रीस प्रतिसाद मिळाला नसल्याचे व मालमत्ता विक्रीचे प्रयत्न पुन्हा सुरु असल्याचे राज्य सहकारी बँकेने कळविले आहे.

---

**राज्यातील व विशेषतः महामुंबई उत्तर-पूर्व परीक्षेत्रातील नागरिकांना व त्यांच्या पाल्यानां शैक्षणिक व सेवाविषयक लाभ प्रत्यार्पित करण्याकरिता आवश्यक असलेली जातीची प्रमाणपत्रे मिळण्याबाबत**

**(६) २८९५७ (२३-१२-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व विशेषत: महामुंबई उत्तर पूर्व परिक्षेत्रातील नागरीकांना व त्यांच्या पाल्यांना शैक्षणिक व सेवाविषय लाभ प्रत्यार्पित करण्याकरिता आवश्यक असलेली जातीची प्रमाणपत्रे मिळण्याबाबतची मागणी समाजवादी युवजन सभा, स्थानिक जनप्रतिनिधी सेवाभावी संस्था, रहिवाशी संघ आणि विविध प्रवर्गीय मागास समाजातील युवक-युवती यांनी मा.मंत्री (सामाजिक न्याय), मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय), प्रधान सचिव (सामाजिक न्याय), संबंधित जिल्हयाचे विभागीय महसूल आयुक्त/जिल्हाधिकारी तसेच जिल्हा समाजकल्याण अधिकारी (वर्ग-१) विभागीय समाजकल्याण आयुक्त (कोकण विभाग), समाजकल्याण उपआयुक्त (उत्तर पूर्व मुंबई उपनगर जिल्हा) माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान यांच्याकडे लेखीनिवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०३-२०१७) :** (१) अभिलेखात शोध घेतला असता सदरचे निवेदन आढळून आले नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जालना जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांमधून मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क वसूल केले जात असल्याबाबत

**(७) ३३५९३ (१८-०१-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कुठल्याही शैक्षणिक व अन्य शुल्क वसुली करु नये, असे परिपत्रक समाजकल्याण संचालक, पुणे यांनी काढले असतानाही या परिपत्रकाकडे दुर्लक्ष करून जालना जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांमधून मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क वसूल केले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोषी समाजकल्याण अधिकाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही करण्याची मागणी योगेश गाडगे (रा.सिरसवाडी, ता.जालना) यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,व तद्नुसार दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०३-२०१७) :**(१) नाही.
(२) श्री.योगेश घाडगे यांनी जिल्हाधिकारी, जालना यांना उद्देशून लिहिलेल्या निवेदनात कोणत्या महाविद्यालयांनी शिक्षण शुल्क व इतर शुल्काची मागणी केली ही बाब स्पष्ट केलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### देऊळगांव राजा (जि.बुलढाणा) या आश्रमशाळेतील कर्मचा-यांवर आर्थिक, मानसिक व अनुसूचित जातीयवादी दृष्टीकोनातून सतत अन्याय होत असल्याबाबत

**(८) ३४२७६ (२४-०२-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कै.लक्ष्मीबाई माध्यमिक आश्रम शाळा, शिवणी आरमाळ ता.देऊळगांव राजा (जि.बुलडाणा) या आश्रमशाळेतील कर्मचा-यांवर आर्थिक व मानसिक तसेच अनुसूचित जातीयवादी

दृष्टीकोनातून सतत अन्याय होत असल्याबाबत दि. ६/१०/२०१० रोजी सेकेटेरी, महाराष्ट्र राज्य ॲन्टी करप्शन कमेटी (लिगल) बुलडाणा यांच्याकडे केल्यानंतर यासंदर्भात सहायक आयुक्त,बुलडाणा यांनी दि ७/२/२०१३ रोजी सुनावणी घेतली व त्यावेळेस सेकेटेरी,महाराष्ट्र राज्य ॲन्टी करप्शन कमेटी (लिगल) बुलडाणा यांना देखील बोलावून सुनावणी घेण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सुनावणीनंतर या संदर्भातील अहवाल तयार करण्यात आला आहे काय व त्याचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, यासंदर्भात मा.मुख्यमंत्री, मा.सामाजिक न्याय राज्यमंत्री, सहायक आयुक्त, समाजकल्याण, बुलडाणा तसेच संचालक, समाजकल्याण, पुणे आदिंना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी पत्रव्यवहार करून सदर बाब निदर्शनास आणूनही अद्‌याप कोणतीच कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्‌याप कारवाई न होण्याची कारणे काय आहेत,

(५) उक्त आश्रमशाळांची सखोल चौकशी करून त्वरीत कारवाई करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) सहा.आयुक्त, समाजकल्याण बुलढाणा यांनी सुनावणीनंतर अहवाल तयार केला आहे. या अहवालानुसार आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे संस्थेचे अध्यक्ष व मुख्याध्यापक यांचे सोबत मतभेद असल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व संस्थेने प्रचलित नियमाविरुध्द कार्यवाही केल्याचे दिसून आले. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांनी सुनावणी घेवून संस्थेविरुध्द दंडात्मक कार्यवाही केलेली आहे.

---

**जालना जिल्हयात जात प्रमाणप्रत्र व नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रलंबित असल्याबाबत**

**(९) ५२६६१ (२८-०४-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयात जात प्रमाणप्रत्र व नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र मिळण्यासाठी संचिका दाखल करुन चार महिन्यांचा कालावधी लोटला तरी अद्‌याप प्रमाणपत्र मिळाले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदनापूर तालुक्यातील एक हजार ७७ संचिका प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या विविध पदांच्या भरतीच्या जाहिराती येऊनही विविध प्रमाणपत्र मिळत नसल्याने उमेदवारांना अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.

दिनांक १ जानेवारी, २०१६ ते आजपर्यंत एकूण ६१५४ जातप्रमाणपत्र व १५४८ नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

बदनापूर तालुक्यात माहे फेब्रुवारी, २०१६ अखेर पर्यंत एकूण ६६७ जात प्रमाणपत्र प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी ३९६ जात प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली असून २७१ जात प्रमाणपत्र त्रुटीच्या पूर्ततेकरीता प्रलंबित आहेत. तसेच २६ नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या प्रस्तावांपैकी २२ नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्रे देण्यात आली असून ४ प्रस्तावात त्रुटी आहेत.

(३) हे खरे नाही.

भरतीसाठीच्या उमेदवारांना प्राधान्याने प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाच्या मागासविद्यार्थ्यांसाठी असलेल्या मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीपासून मागासवर्गीय विद्यार्थ्यी वंचित असल्याबाबत

**(१०) ५३५४९ (२०-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने गेल्या वर्षापासून २०१५-१६ मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती सुरु केली असून नववी दहावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षासाठी २२५० रु शिष्यवृत्ती दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता विद्यार्थ्यांचे ओळखत्र, जातीचा दाखला, पालकांचा उत्पन्नाचा दाखला या कागदपत्रासह विद्यार्थ्यांचे प्रस्ताव शाळांच्या मार्फत ऑनलाईन समाजकल्याण मंत्रालयाकडे पाठविणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतानाही शाळेची पाहिली सहामाही पूर्ण होवून महिना उलटलातरी शाळांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास शाळांच्या हलगर्जीपणामुळे, हजारो मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्य वृत्तीपासून वंचित रहावे लागल्याची बाब माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी केलेल्या चौकशीचे निकर्ष काय आहेत व मागासवर्गी विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहू नयेत म्हणून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०३-२०१७) :** (१) होय.

अनुसूचति जातीच्या इयत्ता ९ वी व १० वी च्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती लागू करण्यात आली असून अनिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व विद्यावेतन रु.२२५०/- व निवासी विद्यार्थ्यांना रु.४५००/- देण्यात येते.

(२) सदर योजना ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत असून त्यासाठी पालकांचा उत्पन्नाचा दाखला व विद्यार्थ्यांच्या जातीचा दाखला आवश्यक आहे.

ऑनलाईन भरलेले अर्ज शाळामार्फत जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे पाठविण्यात येतात.

(३) ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया दिनांक २०.८.२०१६ पासून सुरु करण्यात आली आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

विद्यार्थ्यांचे जातीचे दाखले नसल्यामुळे ही परिस्थिती उद्भवली असून त्यासाठी जातीचे दाखले देण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहे.

---

## उल्हासनगर तालुक्यातील अपंगांना संजय गांधी निराधार योजना व इतर लाभापासून वंचित ठेवल्याबाबत

**(११) ५४६९९ (२०-०८-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर, जि. ठाणे येथील तहसील कार्यालयात तहसीलदार यांच्या मनमानी कारभारामुळे हजारो गरीब व बहुजन समाजातील नागरिक संजय गांधी योजनेच्या लाभापासून वंचित असल्याबाबत अपंग सेवा संघाच्या अध्यक्षांनी मा.सामाजिक न्यायमंत्री महोदयांकडे दिनांक २४ मे, २०१६ रोजी लेखी तक्रार दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तक्रारीनुसार संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, राष्ट्रीय कुटुंब अर्थ सहाय्य योजना इत्यादी योजनामध्ये फार मोठ्या प्रमाणावर प्रकरणे नामंजूर असून मंजूर प्रकरणाची संख्या अत्यल्प आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त नामंजूर प्रकरणाचे कारण म्हणून तहसिलदारांनी तहसील कार्यालायानेच दिलेले उत्पनाचे दाखले फार मोठ्या प्रमाणावर रद्द ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने तहसील कार्यालयाच्या संबंधित अधिकारी/ यांचे विरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली तसेच योजनाचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थींना मिळण्याबाबत काय उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०३-२०१७) :** (१) सदर पत्र प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, अपंग सेवा संघाच्या अध्यक्षांनी तहसिलदार कर्यालय उल्हासनगर यांचेकडे दि. २०.०४.२०१६ रोजी उल्हासनगर तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेसंदर्भात पत्र दिलेले आहे.

(२), (३) व (४) उल्हासनगर तालुक्यांमध्ये दि. ०१.०४.२०१५ ते दि. ३१.०३.२०१६ या कालावधीत संजय गांधी निराधार अनुदान व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन या योजनांमध्ये लाभ मिळण्यासाठी ४७३ प्रकरणे प्राप्त झाली होती. सदर प्राप्त प्रकरणांपैकी १७५ प्रकरणे मंजूर झाली असून उर्वरीत २८६ प्रकरणे विहीत उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त उत्पन्न असणे, वास्तव्य दुसऱ्या तालुक्यात असणे, अर्जदार दिलेल्या पत्यावर राहत नसणे इ.कारणामुळे नामंजूर झाली. विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गतच्या योजनांचा लाभ मिळण्यानुषंगाने विविध निकष विहीत केले असून सदरच्या निकषांची पूर्तता होत असलेली प्रकरणे मंजूर करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

**पेण अर्बन बँक गैरव्यवहाराबाबत**

**(१२) ५६०७७ (२२-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण अर्बन बँक गैरव्यवहार प्रकरणी करावयाची कारवाई व कर्जवसूली यांचा आढावा घेण्यासाठी रायगड अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विशेष कृती समिती स्थापन करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेण अर्बन बँकेच्या पुनरुज्जीवनासाठी करण्यात आलेल्या समितीने उक्त प्रश्नाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-०३-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) बँकेच्या वसुलीचे सनियंत्रण व अनुषंगीक कामकाज करण्यासाठी दि.१६.१२.२०१५ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कृती समिती स्थापन करण्यात आली आहे, त्यानुसार समितीचे कामकाज सुरु आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील याचिका क्र.३६४४/२०११ मधील दि.१७.१०.२०१५ च्या आदेशानुसार बँकेच्या चौकशी कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी दि.०९.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये श्री.जे.ए.पाटील, सेवानिवृत्त न्यायाधिश यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीने दि.०८.०८.२०१६ रोजी मा.उच्च न्यायालयास अहवाल सादर केला आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील क्रीमीनल रिट पिटीशन क्रमांक ३१४४/२०१२ मधील दिनांक २०.१२.२०१३ च्या आदेशानुसार महाराष्ट्र ठेवीदार हितसंरक्षण अधिनियम १९९९ (एम.पी.आय.डी) चे तरतुदीनुसार पेण अर्बन बँक लि. पेण या बँकेच्या मालमत्ता जप्त करुन विक्री प्रक्रीया पार पाडण्यात येत आहे.
(३) कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील मराठा समाजाला आरक्षण मिळावे याकरिता हिंगोली ते मुंबई आझाद मैदान दरम्यान रॅली काढून आंदोलन केलेबाबत**

**(१३) ५६१६२ (२०-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठा समाजाला आरक्षण मिळावे याकरिता दिनांक २ मे, ते ३० मे, २०१६ या कालावधीत हिंगोली, परभणी, औरंगाबाद, नाशिक, अकोले, बीड, उस्मानाबाद, सोलापुर, सांगली, सातारा, पुणे व ठाणे या जिल्हयांसह अनेक जिल्हयांनी हिंगोली ते मुंबई आझाद मैदान दरम्यान रॅली काढून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी सामाजिक संघटनांनी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, त्यावर कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच मराठा समाजाच्या मागण्या सोडविण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३१-०३-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) महाराष्ट्रातील सर्व मराठा जातीला कुणबी म्हणून जाहीर करावे, लोकसंख्येच्या प्रमाणात ओ.बी.सी. प्रवर्गातून आराक्षण मिळावे अशा मागण्या करण्यात आल्या होत्या.

मराठा समाजास शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग तयार करुन त्या प्रवर्गातर्गत १६ टक्के आरक्षण देण्याकरिता दि. ९/७/२०१४ रोजी सन २०१४ चा महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.१३ काढण्यात आला व दि.१५/७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मराठा समाजास शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग तयार करुन १६ टक्के आरक्षण देण्यात आले. दि.१४/११/२०१४ रोजी सदर अध्यादेशास व शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने अंतरिम स्थागिती दिली. मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशात हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यामुळे याबाबातचे प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१ कडून प्रलंबित प्रकरणावर निर्णयात्मक कार्यवाही करणेबाबत

**(१४) ५७०८५ (२०-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१ अंतर्गत औरंगाबाद, जालना, परभणी व बीड या चार जिल्ह्यांमध्ये शैक्षणिक, सेवा, निवडणूक व अन्य कारणासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी करणे आणि त्यानंतर वैद्यता प्रमाणपत्र देण्याबाबतची किती प्रकरणे दिनांक ३१ मे, २०१६ रोजी अखेरपर्यंत आली आहेत,

(२) असल्यास, त्यापैकी किती प्रकरणांवर निर्णयात्मक कार्यवाही झाली आहे व किती प्रकरणे प्रलंबित आहेत,

(३) अद्याप प्रलंबित असलेल्या प्रकरणी १२ वी परिक्षा विद्यार्थ्यांची किती प्रकरणे मंजूरीविना प्रलंबित आहेत, त्याची कारणे काय आहेत व विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी जात वैद्यता प्रमाणपत्र तत्काळ मिळावे यासाठी कोणती विशेष उपाययोजना जिल्हा स्थळावर शासनाने केली आहे वा करण्यात येत आहे कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (३१-०३-२०१७) :** (१) दि. ३१ मे, २०१६ अखेर एकूण ११३९९ प्रकरणे प्राप्त झाली आहेत.

(२) माहे सप्टेंबर २०१६ अखेर जातपडताळणीची एकूण ५७३५ प्रकरणे निकाली निघाली असून ५६६४ प्रकरणे त्रुटी पूर्ततेअभावी प्रलंबित आहेत.

(३) इयत्ता १२ वी परिक्षा विद्यार्थ्यांची ९८७ प्रकरणे त्रुटी पूर्ततेअभावी प्रलंबित आहेत. त्रुटींची पूर्तता करण्याकरिता संबंधित अर्जदारास पत्रान्वये तसेच एसएमएसद्वारे कळविण्यात आले आहे. त्रूटींची पूर्तता होताच प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही चालू आहे.

---

## जळगाव जिल्हा मध्यवर्ती बँकेने शासनाचे निर्देश असतानाही शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुर्नगठन केले नसल्याबाबत

**(१५) ६१०८७ (२२-०८-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा मध्यवर्ती बँकेने शासनाचे निर्देश असतानाही शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गटन केलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी कर्जाची रक्कम भरुनही त्यांना पुनर्गठनातून वंचित ठेवले जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व शासनाने संबंधित बँकेवर कारवाई करुन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पुनर्गठन कर्जाची व्यवस्था केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०३-२०१७) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) नाही. कर्जाची रक्कम भरल्यानंतर पुनर्गठनाचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मातंग समाजाच्या विविध समस्यांचे निराकरण करण्याबाबत**

**(१६) ६१३४५ (२०-०८-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शासनास सादर केलेल्या एकूण ८२ शिफारशींपैकी आरक्षणविषयक शिफारशीसह उर्वरित १४ शिफारशी अमान्य करण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमान्य करण्यात आलेल्या आरक्षणासह शिफारशी मान्य करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३१-०३-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) घटनेच्या ३४१ व्या कलमानुसार अनुसूचित जातीच्या यादीत फेरबदल करण्याचे अधिकार केवळ केंद्र शासनास आहेत, राज्य शासनास त्यात कोणताही हस्तक्षेप करता येत नसल्यामुळे आरक्षणाबाबत असलेल्या शिफारशी मान्य करता येत नाहीत. तसेच अन्य शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत आढावा घेण्यासाठी मा.राज्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली वेळोवेळी बैठका आयोजित करण्याचे शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

---

**सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून विकास सेवा सोसायटीच्या मार्फत पीक पहाणी न करता शेतकऱ्यांना कर्ज देणेबाबत**

**(१७) ६१३५० (२२-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून विकास सेवा सोसायटीच्या मार्फत करण्यात येणारे कर्ज वाटप पीक पाहणी करुनच होणार असल्याने त्याचा फटका दुष्काळग्रस्त माण-खटाव तालुक्यातील शेतकऱ्यांना बसणार असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात सहकार मंत्री महोदयांच्या दालनात दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी बैठक होऊन मा.सहकार मंत्री महोदय यांनी एक सदस्यीय चौकशी समिती नेमली, परंतु त्याचा

अहवाल अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही, त्यामुळे शेतकऱ्यांवर शेती कर्जासाठी खासगी सावकारांच्या दारात जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच यामुळे माण-खटाव तालुक्यातील पीककर्ज वाटप कमी होणार आहे व पीक कर्ज वगळता उर्वरित रक्कम शेतकऱ्यांना मध्यम मुदत कर्ज म्हणून घ्यावी लागणार त्याचा व्याजदर ११ टक्के लावला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माण व खटाव या दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचा विचार करता येथे सदर बँकेने पीक पहाणी न करता शेतकऱ्यांना कर्ज द्यावे, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०३-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या, सातारामार्फत नाबार्ड व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या सूचनेनुसार सातारा जिल्ह्यात प्रत्यक्ष पीक पहाणी व मोजणी करुन प्राथमिक विकास सेवा संस्थामार्फत पीक कर्जवाटप केले जात आहे. मात्र शेतक-यांना त्यांच्या वैयक्तिक शेती क्षेत्राच्या प्रमाणात पात्र असलेल्या पीक कर्जाच्या रक्कमेपेक्षा जादा निधीची आवश्यकता असल्यास शेतक-यांची आर्थिक अडचण होऊ नये म्हणून बँकेने १ वर्ष कालावधीची शेतकरी कॅश क्रेडीट योजना सुरु केली असून या योजनेअंतर्गत शेतकरी सभासदाने मागणी केल्यास प्रत्यक्ष पीक क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्राकरीता कर्ज मंजूरी प्रस्तावातील मंजूर असलेल्या कर्ज रकमेइतपत सोसायटीस ९ टक्के व सभासदास ११ टक्के व्याजदराने कर्ज वापट केले जात आहे.

(४) बँकेचा शेतकरी कॅश क्रेडीट योजनेअंतर्गत होणारा कर्जपुरवठा हा लागवड नसलेल्या क्षेत्राकरीता असून तो ऐच्छिक स्वरुपाचा आहे त्या सभासदांची मागणी असेल तरच कर्ज वितरण केले जाते. यामध्ये बँकेचे कोणतेही बंधन नाही. तसेच यावर बँकेने कमीत कमी व्याजदर ठेवलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील वसतिगृहांच्या कर्मचाऱ्यांचे पगार थकित असल्याबाबत

**(१८) ६२२५१ (२०-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील ४३ वसतिगृहांचे कर्मचारी यांना मागील १३ महिन्यापासून पगार थकित असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वसतिगृहांमधील १५४ कर्मचाऱ्यांचे थकित असलेले १३ महिन्याचे पगार किती दिवसात अदा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०१-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील ४३ अनुदानित वसतिगृहांतील कर्मचाऱ्योच माहे नोव्हेंबर २०१४ ते डिसेंबर २०१५ पर्यंतचे थकीत मानधन अदा करण्यात आले आहे. तथापि, माहे जानेवारी २०१६ पासूनचे कर्मचारी मानधन थकीत आहे.
(२) व (३) वसतिगृह कर्मचाऱ्यांचे माहे जानेवारी २०१६ पासूनचे मानधन तसेच विद्यार्थी परिपोषण अनुदान व थकीत इमारत भाडे सन २०१६ मध्ये प्राप्त तरतुदीतून अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाड्यातील जंगम या मूळ जातीत तत्सम मालाजंगम,बेडाजंगम व बुडाजंगम या जातींचा समावेश करणेबाबत

**(१९) ६४९७७ (२०-०८-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागाच्या परिपत्रकानुसार मराठवाड्यातील औरंगाबाद,बीड,नांदेड,उस्मानाबाद,परभणी या जिल्ह्यामध्ये बेडा (बुडगा) जंगम व माला जंगम या जातीचा अनुसूचित जातीमध्ये समावेश केला आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भात जंगम जातीचा इतर मागासवर्ग प्रवर्गात समावेश केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जंगम या मूळ जातीत तत्सम मालाजंगम,बेडाजंगम,व बुडागाजंगम या जातींचा समावेश करून सर्वांना एकाच प्रवर्गामध्ये समावेश करावा अशी मागणी संत शिरोमणी मान्मथस्वामी सेवाभावी संस्था, परभणी यांनी अनेक वेळा मा.मुख्यमंत्री,मा.सामाजिक न्याय मंत्री,सचिव,संचालक,सामाजिक न्याय यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणी बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत व याबाबतची सद्य परिस्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (३१-०३-२०१७) :** (१) व (२) महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीत क्र.९ वर बेडाजंगम, बुडगा जंगम व क्र. ४२ वर माला जंगम अशी नोंद असून इतर मागासवर्ग यादीत क्र. ५८ वर जंगम या जाती समूहाची नोंद आहे.
(३) व (४) सदरच्या मागणीचे निवेदन राज्य मागासवर्ग आयोगास प्राप्त झाले आहे. तथापि, घटनेच्या ३४१ व्या कलमानुसार अनुसूचित जातीच्या यादीत फेरबदल करण्याचे अधिकार केवळ केंद्र शासनास आहेत, राज्य शासनास त्यात कोणताही हस्तक्षेप करता येत नाही.

त्यामुळे सदर निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ओबीसी जाती केंद्राच्या लाभापासून वंचित असल्याबाबत**

**(२०) ६५१४६ (२७-०१-२०१७). श्री.अमित देशमुख (लातूर शहर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एखाद्या जातीचा ओबीसी मध्ये समावेश करावयाचा झाल्यास त्या साठीचा प्रस्ताव राज्य मागासवर्गीय आयोगामार्फत राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाकडे पाठविण्यात येतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्रात गेल्या वर्षभरापासून मागासवर्गीय आयोगच अस्तित्वात नसल्याचीबाब राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे सदस्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मुंबईत सांगितले, हे खरे आहे काय,
(३) तसेच विरशैव लिंगायतांमधील १८ जातींचा समावेश केंद्र सरकारच्या इतर मागासवर्ग यादीमध्ये (सेंट्रल ओबीसी लिस्ट) करण्याची शिफारस राज्य सरकारने राष्ट्रीय इतर मागासवर्ग आयोगाकडे (एन.सी. बी.सी.) माहे ऑक्टोंबर २०१६ च्या अखेरीस केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील १०६ ओबीसी जाती केंद्राच्या लाभापासून गेल्या अनेक वर्षापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राष्ट्रीय इतर मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष शकील अन्सारी यांनी याबाबत सुनावणीसाठी सहकार्य मिळत नसल्याबद्दल राज्य सरकारवर ठपका ठेवला आहे,हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(७) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मागासवर्गीय आयोग स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.

या जातींचा राज्याच्या इतर मागासवर्ग यादीत समावेश असून त्यांना राज्य शासकीय सेवा, शैक्षणिक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूक यासाठी असलेले

आरक्षणाचे लाभ मिळण्यासाठी कोणत्याही अडचणी येत नाहीत. या विभागाच्या दि.५/२/२०१५ च्या पत्रान्वये सदर १०६ जातींचा केंद्राच्या इतर मागासवर्ग यादीमध्ये समावेश करण्याकरिता त्याबाबतचा तपशीलवार अहवाल राष्ट्रीय मागासवर्ग आयोगास पाठविण्यात आला आहे. तसेच दि.२४/८/२०१६ च्या पत्रान्वये त्याबाबत पुन्हा विनंती करण्यात आली आहे.
(५) हे खरे नाही.
(६) व (७) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**मुंबई व ठाणे विभागातील ७० हजार गृहनिर्माण संस्थाबाबत**

**(२१) ६५३१५ (१६-०१-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व ठाणे विभागात सुमारे ७० हजार गृहनिर्माण संस्था असून, शासनाने या संस्थाना ऑनलाईन नोंदणी आणि जिल्हा उप निबंधक कार्यालयाने नियुक्त केलेल्या लेखा परिक्षकाकडूनच लेखापरिक्षण करुन घेण्याचा निर्बंध घालण्याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयाचे उल्लंघन करुन किती सहकारी संस्थांनी स्वतःच्या लेखापरिक्षकाकडून लेखापरिक्षण करुन घेतले आहे तसेच अशा संस्थेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.
तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थेचे लेखापरिक्षण जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयाने नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकाकडूरच करुन घेण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केलेला नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील गावांना उजनी धरणातून व शिरूर तालुक्यातील गावांना जायकवाडी धरणातून प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना राबविण्याबाबत**

**(२२) ६६०६३ (१६-१२-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील ६५ गावांना उजनी धरणातून व शिरूर तालुक्यातील गावांना जायकवाडी धरणातून प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१७-०२-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तात्पुरत्या स्वरुपात प्रारुप अंदाजपत्रक करण्यात आलेले आहे. तथापि राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत नव्याने योजना घेण्यास केंद्र शासनामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येत नसल्यामुळे सदर मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही करणे शक्य नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कडा (ता.आष्टी,जि.बीड) येथिल बंद असलेला सहकारी साखर कारखाना पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(२३) ६६२०० (१७-१२-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडा (ता.आष्टी, जि.बीड) येथील सहकारी साखर कारखाना दुष्काळामुळे मागील ५ वर्षांपासून बंदावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडला असल्याने सदरहू सहकारी साखर कारखाना पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाकडून आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१०-०३-२०१७) :**(१) होय, महेश (कडा) सहकारी साखर कारखाना लि.कडा. ता.आष्टी जि.बीड हा कारखाना सन २०१२-२०१३ पासून बंद आहे.

(२) व (३) सदर कारखान्याकडे, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे कर्ज थकित होते. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने सरफेशी कायद्यांतर्गत कारखान्याची मालमत्ता जप्त केले आहे. कारखाना अवसायनात घेतला असल्याने आता कारखाना पूर्ववत सुरु करण्याबाबतची कार्यवाही करता येणार नाही.

---

**लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित कंपनीने दराची योग्यता निर्धारित न करता सदनिका खरेदी केल्याबाबत**

**(२४) ६७००० (१०-०१-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित कंपनीने दराची योग्यता निर्धारित न करता सदनिका खरेदी केल्याने १.०२ कोटी रूपयांचा जादा खर्च झाल्याचा ठपका भारताच्या

नियंत्रक व महालेखापरिक्षक (कॅग) यांनी राज्य शासनावर ठेवला असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने त्वरीत चौकशी करून आवश्यक कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३१-०३-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे, सन २०१३-१४ या कालावधीमध्ये महामंडळाने खरेदी केलेल्या सदनिकेच्या दराची योग्यता निर्धारित न करता खरेदी केल्याचे आढळून आल्याने महालेखाकार यांच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये रु.७२.२८ लाख विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता सदनिका खरेदीसाठी जादा खर्च केल्याचा आक्षेप नोंदविण्यात आला आहे.
(२) सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीमध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत सी.आय.डी. मार्फत सुरु असलेल्या चौकशीमध्ये विविध प्रकरणात झालेल्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री.इंगळे अटकेत आहेत. उक्त प्रकरणी सदनिकेचे मूळ दस्ताऐवज तत्कालीन उपमहाव्यवस्थापक (आस्थापना) यांनी गहाळ केले असे निदर्शनास आल्यानंतर जबाबदार असलेल्या तत्कालीन महाव्यवस्थापक (प्रशा) श्री. बावणे यांना दि. १८.०८.२०१५ च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

सध्या सदनिका महामंडळाच्या ताब्यात असून सदनिकेचे मूळ दस्ताऐवज गहाळ झाल्याने मुंबई उपनगर जिल्हा अंतर्गत सर्व सहाय्यक दुय्यम निबंधक यांना महामंडळाच्या पुर्वपरवानगी शिवाय बोरीवली येथील सदनिका अन्य पक्षकाराच्या किंवा संस्थेच्या नावाने दस्त नोंदणी करु नये असे कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

**राज्यातील वस्त्रोद्योगाच्या विविध समस्यांचे निरासन करणेबाबत**

**(२५) ६७८१९ (१६-१२-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतीनंतर दुसऱ्या क्रमांकावर असलेला वस्त्रोद्योग व्यवसाय केंद्र सरकारच्या विसंगत आयात-निर्यात धोरणामुळे ५० टक्के यंत्रमाग उद्योग बंद झाले असल्याने वस्त्रोद्योग कारखानदार, व्यावसायिक व कामगार यांच्या निर्माण झालेल्या विविध समस्यांचे निरासन करणेबाबत मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे. सदर पत्र दिनांक ३१/८/२०१६ चे नसून दिनांक ३०/८/२०१६ चे आहे.

(२) सदर पत्रातील एकूण ९ मुद्यांपैकी वस्त्रोद्योग विभागाशी संबंधित मुद्यांवर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच इतर विभागाशी संबंधित असलेले मुद्दे संबंधित विभागाकडे कार्यवाहीस्तव पाठविण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तामिळनाडूतून कर्नाटकमार्गे इचलकरंजीत (जि. कोल्हापूर) येणाऱ्या सूताच्या ट्रकची वाहतूक बंद झाल्याबाबत**

**(२६) ६७८६२ (१६-१२-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कावेरी प्रश्नावरून कर्नाटकामध्ये तामिळनाडू पासिंगच्या काही वाहनांची जाळपोळ करण्यात आल्याचा फायदा घेत तामिळनाडूतून कर्नाटकमार्गे इचलकरंजीत (जि. कोल्हापूर) येणाऱ्या सूताच्या ट्रकची वाहतूक माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा च्या शेवटच्या आठवडयात बंद झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे सूत व्यापारी कारखानदारांना जास्त दराने सूत विक्री करून आर्थिक लूट करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, या प्रश्नासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०३-२०१७) :** (१) होय.

(२) नाही. कारखानदार सूत व्यापा-यांकडून आगावू नोंदणी करुन सूत खरेदी करतात.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचे सानुग्रह अनुदान लाभार्थ्यांना मिळाले नसल्याबाबत**

**(२७) ६८०३१ (१०-०१-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेचे सात महिन्यापासून सानुग्रह अनुदान लाभार्थ्यांना मिळाले नसल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने निराधारांचे थकीत अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-०३-२०१७) :** (१) नाही.
अमरावती जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील सदर योजनांच्या लाभार्थ्यांचे माहे जुलै, २०१६ पूर्वीच्या सात महिन्यांचे अनुदान दर महिन्यांच्या १० तारखेच्या आत वितरीत केले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी आवास योजनेच्या लाभार्थ्यांचे मानधन प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) ६८१९४ (१०-०१-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी आवास योजनेच्या लाभार्थ्यांचे मानधन गेल्या तीन महिन्यापासून ऑनलाईन फॉर्म प्रक्रियेमुळे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर ऑनलाईन प्रक्रिया त्वरित पुर्ण करुन सदरहू योजनेच्या लाभार्थ्यांचे प्रलंबित अनुदान त्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०३-२०१७) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वस्त्रोद्योगांच्या समस्या सोडविण्याकरिता वस्त्रोद्योग धोरण राबविण्याबाबत**

**(२९) ६८५२४ (१६-१२-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वस्त्रोद्योगांच्या समस्या सोडविण्याकरिता शासन वस्त्रोद्योग धोरण राबविणार आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धोरणानुसार कोणकोणत्या उपाययोजना आखण्यात आल्या आहेत वा आखण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्यांची अंमलबजावणी कशा प्रकारे करण्यात येणार आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०१-२०१७) :** (१) होय,

(२) व (३) शासन निर्णय दि. २जानेवरी,२०१२ अन्वये राज्याचे वस्त्रोद्योग धोरण जाहीर करण्यात आले आहे. या धोरणाची अंमलबजावणी खालील योजनाद्वारे करण्यात येते.

१) केंद्र पुरस्कृत टफ योजनेशी संबंधित दिर्घ मुदती कर्जावरील व्याज सवलत योजना.

२) विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील नविन व विस्तारीकरणाच्या वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान.

३) अनु. जाती/जमाती/अल्पसंख्यांक समाजाच्या वस्त्रोद्योग प्रकल्पांचे प्रकल्प प्रस्ताव तयार करणे.

४) अनु.जाती/जमाती/अल्पसंख्यंक समाजाच्या वस्त्रोद्योग प्रकल्पांच्या आधुनिकीकरणाच्या वस्त्रोद्योग प्रकल्पांना १० टक्के भांडवली अनुदान.

५) स्व-अर्थसहाय्यीत वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान.

६) वस्त्रोद्योग प्रकल्पांना व्याज अनुदानाऐवजी भांडवली अनुदान.

त्याचप्रमाणे या धोरणामुळे डिसेंबर २०१६, अखेर राज्यात २४८६ वस्त्रोद्योग प्रकल्पांची स्थापना झाली असून त्यामधून रु. १६,२९९ कोटीची गुंतवणूक व २,४५,९७० इतकी रोजगार निर्मिती झाली आहे.

---

**केंद्र सरकारच्या अनुदान योजनेंतर्गत सुरु झालेले उद्योगधंदे बंद होत असल्याबाबत**

**(३०) ६९०२९ (१६-१२-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच नवउद्यमीसाठी विविध योजना जाहीर केलेल्या असतानाही गेल्या आठ महिन्याच्या कालावधीत देशातील २० नवउद्योग बंद करण्यात आल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रातील उद्योगांना पुर्नजीवन देण्याच्यादृष्टीने राज्य शासनाकडून कोणते प्रयत्न करण्यात आले आहे वा येत आहे,

(३) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व आतापर्यंत किती उद्योगांना पुर्नजीवन देण्यात आले आहे,

(४) तसेच बंद केलेल्या २० नव उद्योगांची नावे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कृषीमालाला योग्य भाव मिळत नसल्याबाबत**

**(३१) ६९३२५ (१६-१२-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कृषीमालाचे भाव घटल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०१-२०१७) :**(१) व (२) शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा यासाठी आधारभूत किंमत योजनेंतर्गत जिल्ह्यात सोयाबीन, मका, मूग, ज्वारी, उडीद व तूर खरेदीसाठी खरेदी केंद्रे सुरु केलेली आहेत. तसेच शेतकऱ्यांना कमी भावात माल विकावा लागू नये यासाठी शेतमाल तारण योजना सुरु केली आहे. याअंतर्गत डिसेंबर, २०१६ अखेरपर्यंत ३४ शेतकऱ्यांना १३३८.८० क्विं. शेतीमालासाठी रु.२७.१४ लाख रुपये वाटप करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तिरोडा (जि. गोंदिया) तालुक्यातील गौण खनिज रेतीघाटमुळे रस्त्यांच्या होत असलेल्या दुरावस्थेबाबत**

**(३२) ६९५६६ (१६-१२-२०१६). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा तालुक्यातून वैनगंगा नदी वाहत असून येथील रेती घाटाचे लिलाव करून मोठ्या प्रमाणात शासनाकडे निधी जमा होतो परंतु बाधित क्षेत्रातील रस्त्यांची रेती वाहतुकीमुळे दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच खनिकर्म विभागाकडून केलेल्या लिलावाचा महसुलातील काही निधी बाधित क्षेत्रातील रस्ते दुरुस्ती करिता वापरण्याबाबत शासनाने काही तरतूद केली आहे काय, असल्यास तो बाधित क्षेत्रात वापरला जातो काय,

(३) असल्यास, तिरोडा येथील नदिघाटाला जाणारे रस्ते अतिशय दयनीय अवस्थेत असून सन-२०१२ पासून तिरोडा तालुक्याला खनिकर्म विभागाकडून निधीच देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर क्षेत्रात रस्ते बांधकामाकरिता स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक २१ सप्टेंबर,२०१५ व दिनांक २४ मे,२०१६ रोजीच्या पत्रान्वेय मा.खनिकर्म मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रस्त्याच्या दुरावस्थेमुळे तिरोडा तालुक्यात अपघाताचे प्रमाण जास्त आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासन खनिकर्म विभागाकडून रस्ते बांधकाम व दुरुस्तीकरिता निधी देणार आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-०३-२०१७) :** (१) व (२) खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम २०१५ च्या कलम ९ (ब) च्या तरतुदींप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करण्यात आले आहे. प्रस्तुत जिल्हा खनिज प्रतिष्ठान मार्फत संबंधित जिल्ह्यातील खाण बाधित क्षेत्र व समुदायाचा विकास करण्यात येणार आहे. जिल्हा खनिज प्रतिष्ठान ला संबंधित जिल्ह्यातील खाणपट्टा धारकांकडून स्वामित्वधनाच्या व्यतिरिक्त स्वामित्वधनाच्या ३०% रक्कम प्रमुख खनिजाकरिता आणि १०% रक्कम गौण खनिजाकरिता अंशदान म्हणून जमा करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र खनिज विकास निधी (निर्मिती व उपयोजन) अधिनियम, २००१ निरसित करण्यात आला आहे.
(३) खनिज विकास निधी अंतर्गत गोंदिया जिल्हयातील एकूण रु.६४६.३१ लक्ष रकमेच्या ५४ कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून सदर ५४ कामांपैकी तिरोडा तालुक्यातील रु.७०.७० लक्ष रकमेची ५ कामे आहेत. त्यामध्ये सन २०१२ नंतर रु.३०.०० लक्ष रकमेच्या २ कामांचा समावेश आहे.
(४) मा. श्री. विजय भरतभाऊ रहांगडाले, विधानसभा सदस्य, तिरोडा यांनी त्यांच्या दिनांक २१.०९.२०१५ च्या आणि दिनांक १६/०५/२०१६ च्या पत्रान्वये महाराष्ट्र खनिज विकास निधी अंतर्गत तिरोडा विधानसभा क्षेत्रातील रस्ते विकासाकरिता निधी उपलब्ध करून देणेबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांकडे विनंती केली आहे. प्रस्तुत पत्रातील मागणी बाबत पुढील कार्यवाही करणेबाबत जिल्हा खनिज प्रतिष्ठान गोंदिया यांना अवगत करण्यात आले आहे.
(५) हे खरे नाही.
(६) दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन अधिसूचनेद्वारे खाण बाधीत क्षेत्र व व्यक्तींच्या विकासकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा खनिज प्रतिष्ठान ची स्थापना करण्यात आली आहे. प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत खाण बाधीत क्षेत्र व व्यक्तींच्या विकासाकरिता खाणपट्टा धारकांकडून जिल्हा खनिज प्रतिष्ठानकडे प्राप्त अंशदान रक्कमेतून जिल्ह्यातील विकास कामे केली जातील.

---

**कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँक, कोल्हापूर शेतकऱ्यांचे पीक कर्ज मंजूर करीत नसलेबाबत**

**(३३) ६९५७९ (१७-१२-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी तालुक्यातील मळाइदेवी मालेगाव, शिवशंभो माळापुडे,कै.सर्जेराव कृ.पाटील,कडवे या वि.का.स. सेवा संस्थांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेकडे रतिसर पीक कर्ज मागणी प्रस्ताव सादर केला आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थांची कोणतीही थकबाकी नसूनही बँकेने कर्ज अर्ज प्रलंबित ठेवले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेने अवसायानात असलेल्या संस्थाना नाममात्र थकबाकी भरून कर्ज वाटप सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी करून सदर संस्थाना त्वरित पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०३-२०१७) :** (१) मळाईदेवी विकास मालेगांव या संस्थेचा पीक कर्ज मागणी प्रस्ताव अद्याप बँकेकडे प्राप्त झालेला नाही. उर्वरित शिवशंभो विकास माळापुडे व कै.सर्जेराव कृ.पाटील कडवे या संस्थांचे पीक कर्ज मागणी प्रस्ताव (क.म.पत्रक) अनुक्रमे दि.१३/१२/२०१६ व दि.२६/१२/२०१६ रोजी मंजूर करण्यात आलेले आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ऊसाचे उत्पादन कमी असल्यामुळे यंदाचा गळीत हंगाम डिसेंबरऐवजी ५ नोव्हेंबरपासून सुरू करण्याबाबत**

**(३४) ७०४८६ (१६-१२-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऊसाचे उत्पादन कमी असल्यामुळे यंदाचा गळीत हंगाम डिसेंबरऐवजी ५ नोव्हेंबरपासून सुरू करणार असल्याचे शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारखाने ऊसाची १०० टक्के एफआर एकरकमी देणार असून ऊस ऊपादकांना टनास जादा ५०० रूपये देण्यासाठी राज्य शासनाने मदत करावी अशी मागणी कारखानदारांच्यावतीने शासनास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१०-०२-२०१७) :** (१) होय.

गळीत हंगाम सन २०१६-१७ करीता प्राथमिक अंदाजानुसार राज्यात ६.३३ लाख हेक्टर क्षेत्रावर ऊस लागवड असून निव्वळ गाळपासाठी अंदाजे ४५५ लाख मे.ट. ऊसाची उपलब्धता अपेक्षित आहे. सरासरी ११.३०% साखर उताऱ्याने ५०.२८ लाख मे.ट. साखर उत्पादन होईल असा अंदाज आहे. मा. मंत्री समितीच्या दिनांक १९/१०/२०१६ च्या झालेल्या बैठकीत २०१६-१७ चा गळीत हंगाम दिनांक ०५ नोव्हेंबर २०१६ पासून सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यात गौण खनिज विकास निधीतून बंधाऱ्याच्या कामास मंजूरी देणेबाबत**

**(३५) ७०५३५ (१६-१२-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील देगलूर व बिलोली तालुक्यातील मांजरा, गोदावरी, मन्याड या प्रमुख नद्यातील रेती उत्खननामुळे या परिसरात पर्यावरणाचे असंतुलन झाल्याने गौण खनिज विकास निधी अंतर्गत पर्यावरण संतुलन कायम राखणे, २०% निधीतून या परिसरातील बंधाऱ्याच्या कामास मंजूरी देण्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांना दिनांक ४ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास पत्राद्वारे सुचना देण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित बंधाऱ्याच्या कामास मंजुरी देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-०२-२०१७) :** (१) व (२) महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी अधिनियम, २००१ अंतर्गत शासन निर्णय दिनांक ०१.०८.२०१२ अन्वये निधी वितरणाबाबतची मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली होती. प्रस्तुत शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे नांदेड जिल्ह्याकरिता महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्या. नागपूर यांच्याकडून प्राप्त प्रस्तावांमध्ये रुपये ११६३.५३ लक्ष च्या एकूण ३५ कामांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. प्रस्तुत नांदेड जिल्ह्याच्या खनिज विकास निधी अंतर्गतच्या कामांमध्ये बंधारे कामासाठी कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. सद्यःस्थितीत केंद्रीय खनिकर्म मंत्रालयाने खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ कलम ९ (अ) मध्ये केलेल्या दुरुस्तीप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा खनिज प्रतिष्ठान शासन अधिसुचना दिनांक ०१.०९.२०१६ अन्वये स्थापित करण्यात आले आहेत. नांदेड जिल्हा खनिज प्रतिष्ठान कडून नांदेड जिल्ह्यातील खाण बाधित क्षेत्र व समुदायाचा विकास होणे अपेक्षित आहे. तसेच सद्यःस्थितीत महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी अधिनियम, २००१ निरसित झालेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उपसा जलसिंचन योजनेचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देणेबाबत**

**(३६) ७०५३९ (१७-१२-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील कुंडलवाडी येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीकडील कुंडलवाडी शेळगाव-चन्नापुर व पाटोदा माष्टी ता. बिलोली या उपसा जलसिंचन योजनेंअतर्गत कर्जदार शेतकऱ्यांना योजनेचा लाभ झाला नसल्यामुळे त्यांच्या ७/१२ उताऱ्यावरील नमूद बोजा माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे कर्ज माफ करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, उक्त कर्ज माफी प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) विदर्भ व मराठवाड्यातील उपसा जलसिंचन संस्थांच्या कर्जमाफीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**नाशिक जिल्हा बँकेच्या संचालकांनी नियमबाहय कर्मचा-यांची भरती केल्याबाबत**

**(३७) ७०७९७ (१७-१२-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा बँकेच्या संचालकांनी आर्थिक गैरव्यवहार करुन तसेच आरक्षणाचे नियमांचे उल्लंघन करून नियमबाहय चारशे कर्मचा-यांची भरती केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त नियमबाहय भरती करणा-या संचालक मंडळवर ॲक्ट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी विभागीय आयुक्तांच्या मागासवर्गीय कक्षाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत दोषी आढळलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे. बँकेच्या संचालक मंडळाच्या दिनांक २०/८/२०१६ रोजीच्या सभेतील ठराव क्र.७ अन्वये ३०० क्लार्क व १०० शिपाई यांच्या तात्पुरत्या नेमणूका केल्या आहेत.
(२) होय.

डॉ.गिरीश मोहिते यांनी विभागीय आयुक्त (मागासवर्गीय कक्ष) नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे दिनांक २५/८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर मागणी केली आहे.
(३) व (४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांच्या कार्यालयाने प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन बँकेने बिंदू नामावली नोंदवही तपासून न घेता सदर चारशे कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केलेल्या आहेत. सदर ४०० कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करतांना अनुशेष भरतीचे पालन केले नसल्याचा अहवाल विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांना दिनांक ११/११/२०१६ च्या पत्रान्वये सादर केला आहे. सदरहू अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सहाय्यक आयुक्त (मागासवर्गीय कक्ष) नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे दिनांक १९/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सहकार विभागाच्या अनुशेष, सरळसेवा भरती व पदोन्नतीने रिक्त पदे भरण्याबाबत

**(३८) ७०८०४ (१७-१२-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात सहकार विभाग (प्रशासन) सरळसेवा भरती, अनुशेष भरती तसेच पदोन्नती भरती मोठ्या प्रमाणात रिक्त पदे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे भरण्याबाबत शासनाने व सहकार विभागाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करत आहे,

(३) असल्यास, राज्याच्या सहकार विभागातील अनुशेषाची तसेच पदोन्नतीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) तसेच शासकीय परिपत्रक शासन निर्णयान्वये सहकार विभाग (प्रशासन) सरळसेवा व अनुशेषाची तसेच पदोन्नतीची कार्यवाही न करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०१-२०१७) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) व (३) गट-अ संवर्गात, सरळसेवा, अनुशेष व पदोन्नती भरतीमधील एकही पद रिक्त नाही. गट-ब संवर्गातील सरळसेवेच्या पद भरतीच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्याची तसेच पदोन्नतीबाबतची कार्यवाही सुरु आहे. सहकार विभागातील प्रशासन विभागामध्ये दि.३०/०९/२०१६ अखेर गट-क मध्ये ३३१९ मंजूर पदांपैकी १०२६ पदे तर गट-ड मध्ये ८६२ मंजुर पदांपैकी ३१० पदे रिक्त आहेत.

गट-क व गट-ड संवर्गातील ५०% रिक्त पदे भरण्यास प्रधान सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीची मान्यता प्राप्त झाली असून शासन पत्र दि.१०/८/२०१६ नुसार गट-क व गट-ड संवर्गातील ५०% रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णय दि.२/६/२०१५ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### देवरी व सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) तालुक्यातील शेतक-यांना सावकराच्या कर्जातून मुक्तता मिळण्याबाबत

**(३९) ७०९०५ (१७-१२-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरी व सडक-अर्जुनी (जि.गोंदिया) तालुक्यातील ५ हजार शेतक-यांनी सावकारांकडे सोने गहाण ठेवून कर्ज घेतले असून या शेतक-यांना कर्जातून मुक्तता मिळण्याबाबत व सावकारांवर कारवाई होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधित सावकारांवर कोणती प्रशासकीय वा दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१६-०३-२०१७)** :(१) होय.
(२) होय.
(३) देवरी व सडक अर्जूनी तालुक्यात एकुण २८ परवानाधारक सावकार आहेत. त्यापैकी २० सावकारांकडून २९५० कर्जदारांच्या रु. ४४००.००/- लक्षच्या याद्या प्राप्त झाल्या होत्या. सदर प्रस्तावापैकी जिल्हास्तरीय समितीने १९ सावकारांचे १७०७ कर्जदारांचे रु. २८७.४४ लक्षचे प्रस्ताव मंजूर केले आहेत.

देवरी तालुक्यातील एका सावकाराने नियोजित पध्दतीने प्रस्ताव सादर करुन शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला यास्तव सदर सावकाराविरुध्द एफ.आय.आर.दाखल केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिल्लोड शहरासह तालुक्यातील निराधारांना संजय गांधी, श्रावणबाळ या योजनांचा लाभ मिळणेबाबत

**(४०) ७१०१३ (१०-०१-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड शहरासह तालुक्यातील निराधारांना संजय गांधी, श्रावणबाळ, विधवा या योजनांचा लाभ मिळावा यासाठी तहसिल कार्यालयात गेल्या दोन वर्षापासून संचिका दाखल असून संचिकेतील छोटया-छोटया त्रुटीमुळे या योजनांपासून निराधारांना प्रशासनाने वंचित ठेवले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या लाभार्थ्यांच्या संचिकेत त्रुटी असेल त्यांना तहसिल प्रशासनाने कोणतीही लेखी किंवा तोंडी सूचना न देता लाभापासून वंचित ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन निराधारांना सदर योजनांचे लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०३-२०१७) :** (१) नाही.

सिल्लोड तहसिलअंतर्गत संजय गांधी योजना समितीच्या वेळोवेळी बैठका आयोजित करुन पात्र लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात आलेले आहे.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बनोटी (ता.सोयगाव,जि.औरंगाबाद) येथील शेतक-यांना वाढीव पिककर्ज जिल्हा बँक देत नसल्याबाबत**

**(४१) ७१०१४ (१७-१२-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बनोटी (ता.सोयगाव, जि.औरंगाबाद) येथील शेतक-यांना दोन महिन्यापासून वाढीव पिककर्ज जिल्हा बँक देत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांच्या कर्जाचे पुनर्गठन करुन त्यांना तात्काळ पीककर्ज वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०३-२०१७) :**(१) नाही.

सन २०१६-१७ या हंगामात औरंगाबाद जिल्हा मध्यवती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने दिनांक ३०/६/२०१६ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेत औरंगाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २०% वाढीव अल्पमुदत पीक कर्ज वाटपाचा निर्णय घेतला होता. त्यानुसार बँकेने बनोटी शाखेशी संलग्न असलेल्या ७ विविध कार्यकारी संस्थांच्या १०३९ शेतकरी सभासदांना रू.७३.०८ लक्ष एवढे वाढीव अल्पमुदत पीक कर्ज वाटप केलेले आहे. सन २०१६-१७ च्या हंगामात बँकेने बनोटी शाखेमार्फत २६५९ सभासदांना रु.९५५.९९ लक्ष एवढे अल्पमुदत पीक कर्ज वाटप केलेले आहे. त्यापैकी १७३ नविन सभासदांना रु.२४.०८ लक्ष एवढे अल्पमुदत पीक कर्ज वाटप केलेले आहे.

औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सोयगांव व बनोटी शाखेमध्ये अथवा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिल्लोड/ सोयगांव यांच्या कार्यालयामध्ये बँक २०% वाढीव पीक कर्ज देत नसल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) राज्यातील खरीप २०१५ च्या हंगामातील टंचाई सदृश्य परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने शेतकऱ्यांसाठी खालीलप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. महसूल व वन विभागाच्या दिनांक २०/१०/२०१५, १०/०३/२०१६ व २३/०३/२०१६ च्या शासन निर्णयांन्वये राज्यातील ५० पेक्षा कमी पैसेवारी असलेल्या २७६०९ गावामध्ये टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर केली आहे व अशा गावातील शेतकऱ्यांकडील शेती कर्ज वसूलीस स्थगिती व पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा फायदा ७१२७५७ शेतकऱ्यांना झाला असून त्यांचेकडील रु.५२१८.७१ कोटी पीक कर्जाचे ५ वर्ष मुदतीच्या कर्जामध्ये पुनर्गठन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या पुनर्गठीत कर्जावरील व्याजाचा बोजा कमी करण्यासाठी शासनाने पुनर्गठीत कर्जावरील प्रथम वर्षाचे संपूर्ण व्याज व पुढील ४ वर्षाचे ६% दराने होणारे व्याज शेतकऱ्यांच्या वतीने बँकांना अदा करण्याचा निर्णय दिनांक ०९/०५/२०१६ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

शासन निर्णयातील सुचनांनुसार औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने केलेल्या जिल्ह्यातील ८८१ पात्र सभासदांचे रु.१७३.८६ लक्ष एवढ्या रकमेचे रुपांतरण केलेले आहे. एकूण रुपांतरणापैकी सोयगांव तालुक्यातील एकूण ५९३ सभासदांचे रु.९९.५८ लक्ष रकमेचे बँकेने रुपांतरण केलेले असून त्यापैकी बनोटी शाखेशी संलग्न असलेल्या वि.का.संस्थांच्या ११ सभासदांच्या थकीत मुद्दल व व्याजाचे एकूण रु.२.३४ लक्ष एवढ्या रकमेचे रुपांतर केलेले आहे. रुपांतरण केलेल्या शेतकरी सभासदांनी संस्थेमार्फत बँकेकडे कर्ज मागणीचे रितसर अर्ज केलेले नसल्याने बँकेने पीक कर्ज वाटप केलेले नाही.

सन २०१५ च्या खरीप हंगामात औरंगाबाद जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राष्ट्रीयीकृत बँक, ग्रामीण बँक व खाजगी बँक यांनी केलेले पुनर्गठन व पुनर्गठन केलेल्या शेतकऱ्यांना केलेले कर्ज वाटप खालीलप्रमाणे आहे :-

<table>
<tr><td rowspan="2">अ.क्र.</td><td rowspan="2">बँकेचे नाव</td><td colspan="2">झालेले पुनर्गठन</td><td colspan="2">पुनर्गठीत शेतकऱ्यांना कर्जवाटप</td></tr>
<tr><td>शेतकरी संख्या</td><td>रक्कम (रु. लाख)</td><td>शेतकरी संख्या</td><td>रक्कम (रु.लाख)</td></tr>
<tr><td>१</td><td>जि.म.स.बँक</td><td>८८१</td><td>१७३.८६</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>२</td><td>राष्ट्रीयीकृत बँक</td><td>४९२८</td><td>४७५६.९२</td><td rowspan="3">७९४७</td><td rowspan="3">६९२७.६६</td></tr>
<tr><td>३</td><td>खाजगी बँक</td><td>५८</td><td>१२१.००</td></tr>
<tr><td>४</td><td>ग्रामीण बँक</td><td>७२५८</td><td>६६९०.९९</td></tr>
<tr><td></td><td></td><td>१३१२५</td><td>११७४२.७७</td><td>७९४७</td><td>६९२७.६६</td></tr>
</table>

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वर्गीय सुधाकरराव नाईक सहकारी साखर कारखाना गुंज, ता. महागाव या कारखान्याच्या नवीन व्यवस्थापनाने २१३ कामगारांना कामावरून काढून टाकल्याबाबत**

**(४२) ७१२४७ (१७-१२-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वर्गीय सुधाकरराव नाईक सहकारी साखर कारखाना गुंज, ता. महागाव या कारखान्याची मालकी हक्काने विक्री करण्यात आल्यामुळे नवीन व्यवस्थापनाने २१३ कामगारांना कामावरून काढून टाकले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्यातील या कामगारांना सन १९९९ ते २०१४ पर्यंतचे मागील १५ वर्षाचे वेतन,भविष्य निर्वाह निधी,पतसंस्था व विम्याची रक्कम (शेअर्स) अदा करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणतीही थकीत रक्कम अदा न करता या सर्व कामगारांना मागील २० वर्षापासून राहत असलेल्या घरातून बाहेर काढण्याची कारवाई व्यवस्थापन करत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख (१०-०२-२०१७) :** (१) नाही.

(२) सदर कारखान्यातील कामगारांना सन १९९९ ते २०१४ पर्यंतचे मागील थकित वेतन भविष्य निर्वाह निधी, पतसंस्था व विम्याची रक्कम अदा करण्यात आली नाही, हे म्हणणे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

कारखाना वसाहतीमध्ये एकूण ४२ कर्मचारी राहत होते. त्यापैकी १६ कर्मचारी यांनी वसाहत खाली करून दिल्याने, त्यांना कामावर घेण्यात आले. उर्वरित २६ कर्मचारी अद्यापही वसाहतीमध्ये राहत असून, त्यांच्यावर वसाहत खाली करण्याबाबत नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्या कर्मचाऱ्यांना थकीत पगाराच्या रकमा अदा केलेल्या आहेत. वसाहतीमध्ये राहणाऱ्या कामगारांना घरे खाली करण्याबाबत नॅचरल शुगर व्यवस्थापन कार्यवाही करत आहे.

(४) सहाय्यक, कामगार आयुक्त, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली दि. ७.११.२०१६ रोजी सरकारी कामगार अधिकारी, यवतमाळ यांच्या कार्यालयात बैठक आयोजित केली होती. या बैठकीला उपोषणकर्ते, वारणा प्रशासनाचे व्यवस्थापन प्रतिनिधी, अवसायक कार्यालयाचे प्रतिनिधी, तसेच एम.एस.सी. बँक नागपूर चे विधि सल्लागार हे उपस्थित होते.यावर चर्चा होवून कामगारांच्या सर्व थकीत रकमा देण्याबाबत आढावा घेवून नॅचरल शुगर प्रा.लि. यांनी स्थानिक कामगारांना प्राधान्याने कामावर घ्यावे, उपोषणार्थी १० कामगार यांना दि.१०.११.२०१६ पासून कामावर घेण्यात यावे , तसेच कारखाना वसाहतीतील क्वार्टर खाली करून मागू नये, सध्या आहे ती परिस्थिती कायम ठेवून लवकर तोडगा काढावा असे ठरले. त्यानुसार दिनांक ७.११.२०१६ रोजी उपोषण मागे घेण्यात आले आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील बडाम्या (ता.रामटेक) येथील आदिवासी बहुल क्षेत्रात आदिवासी विकास विभागाच्या ठक्कर बाप्पा योजनेतून सामाजिक संस्कृत भवन मंजूर करण्याबाबत**

**(४३) ७१५६९ (०१-०१-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील बडाम्या (ता.रामटेक) येथील आदिवासी बहुल क्षेत्रात आदिवासी विकास विभागाच्या ठक्कर बाप्पा योजनेतून सामाजिक संस्कृत भवन मंजूर करण्याची मागणी

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे फेब्रुवारी २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

आदिवासी बहुल क्षेत्र वडम्बा (देवलापार) ता.रामटेक, जि.नागपूर येथील सामाजिक संस्कृत भवन करिता ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत रुपये १.०० कोटी निधी मंजूर करण्याची मागणी केली आहे.

(२) शासन निर्णय दिनांक जून २६, २००७ अन्वये सदर योजनेत घटकांचा समावेश होत असून ११ त्यामध्ये सामाजिक संस्कृत भवन या घटकांचा समावेश होत नाही.

शासन निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २०११ अन्वये एक वस्ती/पाडे/वाडया गावांमध्ये एका वर्षात जास्तीत जास्त दोन कामे घेता येतील व एका गावासाठी दोन्ही कामांसाठी वित्तीय मर्यादा रु.३१.२५ लक्ष एवढी करण्यात आली आहे. दिनांक १३ सप्टेंबर, २०१३ अन्वये वार्षिक विहित करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादेत करावयाच्या कामांच्या संख्येवरील निर्बंध उठविण्यास व आवश्यकतेनुसार विकास कामे करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव ठक्कर बाप्पा योजनेत प्रस्तावित करता येणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारशिवनी (जि. नागपूर) तालुक्यातील गौतम मागासवर्गीय कापूस उत्पादक सहकारी सुत गिरणी मर्या. निंबा हा सुतगिरणी प्रकल्प अपूर्ण असल्याबाबत**

**(४४) ७१६३५ (१६-१२-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील गौतम मागासवर्गीय कापूस उत्पादक सहकारी सुत गिरणी मर्या. निंबा या सुतगिरणीचे प्रकल्प उभारणीचे काम सुरु असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्प उभारणीसाठी कोट्यवधी रुपये खर्च होऊनही अद्याप काम अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पातून स्थानिक बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्प कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०३-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे. सुतगिरणी उभारणीखाली असून सद्यस्थितीत १००८० चात्यांची यंत्रसामुग्री स्थापित करण्यात आली असून दि.५.११.२०१६ पासून उत्पादन सुरु झाले आहे.

(२) सुतगिरणीने १४००० चात्यासाठीचे इमारत बांधकाम पूर्ण केले आहे व सध्या १००८० चात्यांवर सूत उत्पादन सुरु आहे.

(३) या प्रकल्पातून सद्यस्थितीत १४० लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

(४) गिरणीने प्रकल्प अहवालानुसार स्वभागभांडवल गोळा केल्यास त्याप्रमाणे उर्वरित शासकीय भागभांडवल प्राप्त होऊ शकेल व दिर्घ मुदती कर्जाची उभारणी केल्यानंतर प्रकल्प पूर्ण उत्पादनाखाली येऊ शकेल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथे रेशीम पार्क उभारण्याबाबत**

**(४५) ७१९५४ (१६-१२-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे रेशीम पार्क उभारण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेशीम संचालक नागपूर यांनी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत प्रश्न भाग (१) मधील ठिकाणी रेशीम पार्क उभारण्यासाठी दिनांक ५ डिसेंबर, २०१४ रोजी शासनाकडे सविस्तर प्रस्ताव पाठविलेला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०१-२०१७) :** (१) होय.

(२) येवला, जि.नाशिक येथे राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत रेशीम पार्क उभारणीसाठी संचालक (रेशीम) नागपूर यांनी दि.५ डिसेंबर, २०१४ रोजी प्रस्ताव सादर केलेला नसून येवला समुहाची सद्य:स्थिती बाबत माहिती नमूद करुन समुहाचे रुपांतर रेशीम पार्कमध्ये होणेसाठी संचालनालयामार्फत आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देता येतील याबाबत अहवाल सादर केला आहे.

(३) लोकप्रतिनिधीची व स्थानिकांची येवला येथे रेशीम पार्क उभारण्याबाबत मागणी होती. त्या अनुषंगाने येवला जि.नाशिक येथे रेशीम पार्क उभारणीसंदर्भात दि.१८ मे, २०१५ रोजी अपर मुख्य सचिव (वस्त्रोद्योग) यांचे अध्यक्षतेखालील संबंधित अधिकारी व येवला येथील पैठणी क्लटरचे समन्वयक श्री.विक्रम गायकवाड यांचे समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत रेशीम पार्क उभारण्यासंदर्भात आढावा घेण्यात आला. आढाव्याअंती येवला येथील पैठणी क्लस्टरसाठी केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योग विभागाअंतर्गत उपक्रम विशेष हेतू वाहन (SPV) या समुह विकास कार्यक्रमाअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधी पुरेसा असल्याने

तेथे सद्य:स्थितीत राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून रेशीम पार्क उभारण्याची आवश्यक नसल्याचे दिसून आले. समुह विकास कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या प्रस्तावास केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावयाचा झाल्यास तसा पाठपुरावा करण्यात येईल असे बैठकीत ठरविण्यात आले होते. सदर बैठकीच्या इतिवृताची प्रत मा.विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, मुंबई यांना पाठविण्यात आलेली आहे.

पैठणी क्लस्टरसाठी भारत सरकारच्या सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विभागाकडे रुपये १३.५० कोटीचा प्रस्ताव सादर केलेला असून प्रस्तावात असलेल्या बाबी व रेशीम पार्क उभारणीसाठी असलेल्या बाबी एकसारख्या आहेत. प्रस्तावित मशिनरीसाठी साधारणत: वर्षाला १००-१२० मे. टन कच्चे रेशीम सूत लागणार आहे. त्यासाठी येवला समुह व जवळच्या जिल्ह्यामध्ये साधारणत: २३५० एकर तुती लागवड असणे आवश्यक आहे. सदर तुती लागवड होण्यासाठी संचालनालयाबरोबर क्लस्टर पदाधिकाऱ्यांनी यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभग घेतल्यास शासनामार्फत तुती लागवडीसाठी बेणे, रोपे, अंडीपुंज, साहित्य व तुती उद्योगाचे प्रशिक्षण देता येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दि.अकोला होलसेल मर्चंट को-ऑप हाउसिंग कम शॉपिग कॉम्प्लेक्स सोसायटीचे दस्तऐवज जप्त केल्याबाबत**

**(४६) ७२४१८ (१७-१२-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दि.अकोला होलसेल मर्चंट को-ऑप हाउसिंग कम शॉपिग कॉम्प्लेक्स सोसायटीचे दस्तऐवज जप्त करुन सहाय्यक उपनिबंधक कार्यालयात जमा करण्यात यावे असे पत्र उपनिबंधकांनी तहसिलदारांना दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानंतर पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख (१५-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उपनिबंधक सहकारी संस्था, अकोला यांनी दि.२७.०९.२०१६ च्या पत्रान्वये तहसिलदार, अकोला यांना कार्यवाहीसाठी कळविल्यानंतर त्यांचेकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८० अन्वये कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि संस्थेने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचेकडे रिव्हीजन अर्ज दाखल केला असून विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी त्यांच्या दि.०३.१०.२०१६ च्या आदेशान्वये याप्रकरणी अंतरीम स्थगिती दिली आहे. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देऊळगावराजा (जि. बुलढाणा) येथील सहायक निबंधक सहकारी संस्था हे पद प्रभारी पध्दतीने सुरु असल्याबाबत**

**(४७) ७२४५३ (१७-१२-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगावराजा (जि. बुलढाणा) येथील सहायक निबंधक सहकारी संस्था हे पद सन २०१४ पासून केवळ प्रभारी पध्दतीने सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील सुमारे ७२ संस्थांचा कारभार केवळ दोन व्यक्तीच बघत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०९-०२-२०१७) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, देऊळगांव राजा, जि.बुलढाणा या कार्यालयाकरिता वर्ग-३ ची ६ पदे व वर्ग-४ ची २ पदे मंजूर आहेत. त्यापैकी वर्ग-३ चे ३ व वर्ग-४ चे १ कर्मचारी सद्यस्थितीत कार्यरत आहेत. त्यामुळे सदर कार्यालयात एकूण ५ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेडराजा (जि. बुलढाणा) येथील बँक ऑफ महाराष्ट्र बँकेत नवीन पिक कर्ज व पुर्नगठनाकरिता शेतकऱ्यांचे शेकडो प्रस्ताव दाखल असल्याबाबत**

**(४८) ७२४९० (१७-१२-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि. बुलढाणा) येथील बँक ऑफ महाराष्ट्र बँक व स्टेट बँक ऑफ इंडिया, देऊळगाव महि शाखा, जि.बुलढाणा येथील नवीन पिक कर्ज व पुर्नगठनाकरिता शेतकऱ्यांचे शेकडो प्रस्ताव दाखल असून त्यावर बँक व्यवस्थापनांकडून वेळेवर कार्यवाही होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.

बँक ऑफ महाराष्ट्र शाखा सिंदखेड राजा मार्फत बँकेच्या नियमानुसार सन २०१६-१७ या वर्षामध्ये पीक कर्ज घेण्यास पात्र असलेल्या ८४७ शेतकऱ्यांना रू.४३७.१० लाख पीक कर्ज वाटप केलेले असून पात्र असलेल्या ४११ सभासदांचे रू.२३३.८२ लाख रकमेचे पीक कर्ज पुनर्गठण केलेले आहे.

तसेच भारतीय स्टेट बँक शाखा देऊळगांव मही या शाखेमार्फत सन २०१६-१७ या वर्षामध्ये पीक कर्ज घेण्यास पात्र असलेल्या ४१८ सभासदांना रू.२५५.०२ लाख पीक कर्ज वाटप केलेले असून पात्र असलेल्या ३९७ शेतकऱ्यांचे रू.२२७.३१ लाख रकमेचे पीक कर्ज पुनर्गठण केलेले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यात वस्त्रोद्योग उभारण्याच्या घोषणेबाबत**

**(४९) ७२८७८ (१६-१२-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात वस्त्रोद्योग उभारणार असल्याची सरकारने दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०३-२०१७) :** (१) नाही.

(२) तथापि, दि.४ ऑक्टोबर, २०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत जालना येथे रेशीम कोषाची खुली बाजारपेठ उभारण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

प्रस्तुत रेशीम कोषाची खुली बाजारपेठ उभारणीच्या प्रस्तावास राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत निधी उपलब्ध करुन देण्यास राज्यस्तरीय प्रकल्प समितीने मान्यता दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय गांधी निराधार योजनेंतर्गत प्रती मानसी दरमहा देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(५०) ७३६७९ (१०-०१-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी निराधार योजनेंतर्गत प्रती मानसी दरमहा देण्यात येणाऱ्या रुपये ३००/- एवढ्या अनुदानात वाढ करण्याची मागणी मा. लोकप्रतिनिधींकडून सातत्याने शासनाकडे केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने संजय गांधी निराधार योजनेच्या अनुदानात वाढ करण्याबाबत शासानाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-०३-२०१७) :** (१) संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत सद्या रु.६०० प्रतिमहा प्रतिलाभार्थी एवढे अर्थसहाय्य देण्यात येते. सदर अर्थसहाय्यामध्ये वाढ करण्याबाबतची मागणी होत आहे, हे खरे आहे.
(२) व (३) सदर योजनेच्या लाभार्थ्यांच्या मासिक अनुदानात वाढ करण्याच्या प्रस्तावावर विचारविनिमय सुरु आहे.

---

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.